
# सिंदखेडराजा

पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन







नीळकंठेश्वर मंदिर

# सिंदखेडराजा



लेखक
विजय देशमुख
नागपूर



पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग
महाराष्ट्र शासन
१९८२

प्रकाशक
संचालक
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई

ऐतिहासिक स्थलदर्शनमाला–३

मुद्रक
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

मुखपृष्ठ : राजे लखुजीराव जाधव यांचा वाडा

# हृद्गत

सिंदखेडराजा हे जिजामातेचे जन्मस्थान! या ना त्या कारणाने आजपर्यंत उपेक्षित राहिलेले हे शिवतीर्थ आता विकासाची वाटचाल करू लागेल अशी सुलक्षणे दिसू लागली आहेत. महाराष्ट्राचे तडफदार मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले व सिंदखेड विकास समितीचे अध्यक्ष खासदार बाळकृष्ण वासनिक आस्थापूर्वक सिंदखेडकडे लक्ष पुरवीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

अलीकडे सिंदखेडराजाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या बरीच वाढू लागली आहे. परंतु मौज अशी की, या पर्यटकांना उपयुक्त होऊ शकेल अशी सिंदखेड दर्शन घडविणारी छोटी पुस्तिका प्रकाशित करण्याचेही आजवर कोणीच मनावर घेतलेले नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या ‘ पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये ’ विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर यांनी अशी पुस्तिका प्रकाशित करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला. पुस्तिकेसाठी लेखन करण्याची जबाबदारी त्यांनी माझ्याकडे सोपविली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. नागपूर पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक श्री. कावडकर व त्यांचा कर्मचारीवर्ग तसेच नागपूर संग्रहालयाचे अभिरक्षक श्री. मुळे यांचे बहुमोल सहकार्य मला या कामी लाभले. त्यांचाही मी आभारी आहे. या पुस्तिकेचे महाराष्ट्र स्वागत करील असा विश्वास आहे.

**विजय देशमुख**

कार्तिक शु. १५, श्रीशिव शके ३०८ नागपूर

# निवेदन

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या मातोश्री जिजामाता यांचा जन्मोत्सव सोहळा त्यांच्या जन्मगावी म्हणजे विदर्भातील "सिंदखेडराजा" येथे ७ जानेवारी १९८२ पासून ३ दिवसपर्यंत साजरा करण्यात येणार आहे. १९७४ साली अशाच प्रकारचा एक सोहळा सिंदखेडराजा येथे आयोजित केला होता. फार मोठ्या प्रमाणावर जनतेने त्या सोहळ्यात भाग घेतला होता. येत्या जानवारीत साजऱ्या होणाऱ्या सोहळ्यास पण हजारोंच्या संख्येने जनता उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तेव्हा उपस्थितांना सिंदखेडराजा या ऐतिहासिक शहराची थोडक्यात पण मुद्देसूद माहिती देणारी पुस्तिका असावी असा हेतू या प्रकाशनामागे आहे.

नागपूरचे शिवभक्त श्री. विजय देशमुख यांच्यावर लेखनाचे कार्य सोपविले. त्यांनी ते वेळेवर केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. अनेक शासकीय कामांचा व्याप असतानाही मुद्रणालयाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पुस्तिकेची सुबक आवृत्ती काढल्याबद्दल, त्याचप्रमाणे विभागातील ज्या कर्मचाऱ्यांनी या पुस्तिकेच्या कामास हातभार लावला त्यांचाही मी आभारी आहे.

राजमाता जिजाबाई यांच्या जन्मस्थानाबाबत व जन्मतिथीबाबत व छत्रपती शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीबाबत इतिहासकारांचे एकमत नाही. या पुस्तिकेत यासंबंधीचा मजकूर हा लेखकाच्या मताचा द्योतक आहे, शासन त्याच्याशी सहमत आहेच असे गृहीत धरू नये.

मुंबई  
दत्तजयंती  
१० डिसेंबर १९८१

**अ. प्र. जामखेडकर**

# सिंदखेडराजा

## शिवशक्तीचे आदिपीठ

छत्रपती श्रीशिवरायांच्या मातोश्री जिजाऊसाहेब यांचा जन्म जिथे झाला ते सिंदखेडराजा हे गाव शिवतीर्थांच्या नामावळीतील अग्रस्थान प्राप्त झालेले पावन ऐतिहासिक क्षेत्र आहे. एका अर्थी मध्ययुगीन शिवशक्तीचे ते आदिपीठ आहे. शिवपूर्वकाळातील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींचे सिंदखडराजा हे प्रसिद्ध केंद्र होते. येथे जन्मलेल्या मातोश्री जिजाऊसाहेबांचा जीवनप्रवाह जसजसा प्रवाहित होत गेला तसतसा अवघा महाराष्ट्र तीनश वर्षांपूर्वीच नकळत एका भावनिक सूत्रात बांधला गेला. विदर्भात सिंदखेडला जन्मलेल्या जिजाऊसाहेबांचे सासर मराठवाड्यातील वेरुळला तर शिवरायांना त्यांनी जन्म दिला तो पश्चिम महाराष्ट्रात शिवनेरी किल्ल्यावर आणि शिवराय छत्रपती झालेले पाहून कृतार्थ होऊन त्यांनी देह सोडला तो कोकणात रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे! असा अवघा महाराष्ट्र मातोश्री जिजाऊसाहेबांच्या अलौकिक कर्तृत्वामुळे एकसूत्रात बद्ध आहे. स्वाभाविकच शिवशक्तीच्या उगमस्थानाला–सिंदखेडराजाला–एक आगळे महत्त्व प्राप्त झाल्ले आहे. कालांतराने मल्हारराव होळकरांनी मानसिंगराव जाधवरावांना ‘तुम्ही मऱ्हाटे याची कासी आहात’ असे म्हटले त्यामागेही अशीच भावना आहे. भारतात काशीचे जे महत्त्व तेच महाराष्ट्राच्या भावविश्वात सिंदखेडला महत्त्व आहे. शिवछत्रपतींचे आजोळ म्हणून जसे सिंदखेडला महत्त्व आहे तसेच ते जाधवरावांची राजधानी म्हणूनही आहे.

## सिंदखेडचा संक्षिप्त इतिहास

सिंदखेडचे मूळ नाव आलापूर असल्याचे जाधवरावांच्या बखरीत नमूद केलेले आहे. गवळी राजा सिंदुराज याने पुढे वस्ती केली म्हणून आलापूरचे नाव सिंदखेड पडले असे तेथे म्हटलेले आहे. परंतु सिंदुराजाच्या राजवटीचा कुठलाच पुरावा येथे आढळत नाही. सिंदखेडचे मूळ नाव सिद्धपूर किंवा सिद्धक्षेत्र असावे

असे अन्य काही पुराव्यांवरून दिसते. सिंदखेड येथील नीळकंठेश्वराच्या देवालयामधील एका शिलालेखावर ' परगणे सिधपूर' असा उल्लेख आढळतो. सिंदखेडचे सुप्रसिद्ध संत कवी गोसावीनंदन यांच्या एका ओवीबद्ध चरित्रामध्ये 'सिंदखेड स्थळ। सिद्धांचे केवळ। देखोनी तात्काळ। वास केला।' असे म्हटलेले आढळते. त्यावरून सिंदखेडचे मूळ नाव सिद्धक्षेत्र असावे आणि सिद्धक्षेत्रचा अपभ्रंश पुढे सिंदखेड झाला असावा असे वाटते.

श्रीनीळकंठेश्वर मंदिर, पुतळा बारव, रामेश्वर मंदिर यांसारख्या काही अवशेषांवरून बाराव्या शतकापासूनच सिंदखेड हे अतिशय महत्त्वाचे स्थळ असले पाहिजे हे स्पष्ट होते. दुर्दैवाने या दृष्टीने या स्थळाचे अजून पुरेसे संशोधन झालेले नाही. ते झाल्यास या बाबतीत अधिक प्रकाश पडू शकेल.

या गावी शरभंग ऋषींचा आश्रम होता तसेच येथील रामेश्वराचे लिंग प्रभू रामचंद्रांनीच लंकेला जात असताना स्थापन केले अशी पारंपरिक माहिती आहे. नीळकंठेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार इ. स. १५८७ साली (सर्वजित् नाम संवत्सराच्या श्रावण शुद्ध पाडव्याला, शके १५०९) राघोजी लुकजी जाधवराव याने केला असल्याचे तेथील एका शिलालेखावर कोरलेले आहे. याचा अर्थ हे देवालय बरेच जुने असले पाहिजे हे स्पष्ट आहे.

सिंदखेड परगणा इ. स. १४५० च्या सुमारास स्थानिक काझी घराण्याला जहागीर म्हणून दिला होता. तो सुमारे १०० वर्षे त्यांच्याकडे असावा. सोळाव्या शतकात सिंदखेडची देशमुखी मुळे घराण्याकडे होती. त्यांचा गुमास्ता रविराव ढोणे हा हळूहळू पुंडाई करू लागला. देशमुखी आपल्या नावे करून घेण्यासाठी त्याने अखेर मुळे घराण्याची कत्तल उडविली व तो जबरीने येथील वतन उपभोगू लागला. मुळे घराण्यातील एक गरोदर स्त्री यमुनाबाई ही रविरावाच्या कत्तलीतून वाचली होती. ती पैठण परगण्यातील लासनेर या गावी लक्ष्मणसिंह ऊर्फ लखुजी जाधवराव यांच्याकडे आली. त्या वेळी लखुजीराजे निजामशहाच्या पदरी पंचहजारी मनसबदार होते. मेहेकर सरकारातील सिंदखेड परगणा त्यांच्या जहागिरीत होता. त्यामुळे यमुनाबाईने रविरावाची तक्रार त्यांच्याकडे केली.

यमुनाबाईच्या तक्रारीवरून लखुजीराजे आपले बंधू जगदेवराव ऊर्फ भेतोजी यांच्यासह सिंदखेडला आले. रविरावाच्या गढीवर अकस्मात हल्ला करून त्यांनी

रविरावाला ठार केले. यमुनाबाईने यानंतर आपले देशमुखीचे वतन संतोषपूर्वक लखुजीराजांच्या नावे करून दिले. अशा रीतीने इ.स. १५७६ पासून लखुजीराजे सिंदखेडचे देशमुख म्हणून येथे स्थायिक झाले.

पुढे मूर्तजा निजामशहाकडून त्यांना दहाहजारी मनसबदारी, अठ्ठावीस महाल व बावन्न चावडयांचे वतन प्राप्त झाले. लखुजींचे वभव वाढले तसे स्वाभाविकच सिंदखेडचेही वैभव वाढले. या गावाला राजधानीसारखे स्वरूप प्राप्त झाले. सिंदखेडची लोकवस्ती त्या काळात चाळीस हजारावर पोहोचली. लखुजीराजांचे दहा हजार लष्करही येथेच राहू लागले. सिंदखेडचे सिंदखेडराजा झाले ते याच काळात.

लखुजींनी आपल्या निवासासाठी एक टोलेजंग गढी सिंदखेडला बांधली. कदमापूर, माननगर इत्यादी पेठा वसवल्या. नामांकित आंबराया लावल्या. नीळकंठेश्वर, केशवराज, रामेश्वर या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. तसेच मातापूरची रेणूकाही त्यांनीच सिंदखेडला स्थापन केली.

लखुजींना यमुनाबाई, भागीरथीबाई व म्हाळसाबाई ऊर्फ गिरिजाबाई अशा तीन बायका व दत्ताजी, रघोजी, अचलोजी आणि बहादूरजी असे चार पुत्र होते. लखुजींचे धाकटे बंधू जगदेवराव ऊर्फ भेतोजी यांना अपत्य नसल्याने बहादूरजी त्यांच्याकडे दत्तक गेलेला होता.

**जिजामातेचा जन्म**

लखुजीराजांना चार पुत्र होते पण कन्या नव्हती. म्हणून म्हाळसाबाईने कन्याप्राप्तीसाठी रेणुकेला 'बहु नवस' केले. रेणुका नवसाला पावली आणि हेमलंबी नाम संवत्सर शके १५१९ च्या पौष शुद्ध पौर्णिमेला, गुरुवारी, पुष्य नक्षत्रावर, सूर्योदय समयी (दिनांक १२ जानेवारी १५९८ रोजी सकाळी ६ च्या सुमारास) सिंदखेडच्या राजवाडयात म्हाळसाबाईच्या पोटी जिजाऊ जन्मास आली. जिजामातेचा जन्म ही भावी इतिहासाला कलाटणी देणारी शुभ घटना ठरली. तिच्यामुळेच जाधवराव व भोसले ही दोन मातब्बर कुळे जोडली गेली.

जिजाऊच्या जन्मामुळे अवघे सिंदखेड आनंदले. हत्ती-घोडयांवरून साखर पाने वाटली गेली. लखुजीराजांनी जिजाऊच्या जन्माप्रीत्यर्थ नगर भोजन दिले. दिवाळी होऊन गेली होती तरी सिंदखेडवासियांनी पुन्हा दीपोत्सव साजरा केला.

## जिजाऊचा विवाह

इ. स. १६१० च्या सुमारास जिजाऊचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला. या विवाहाच्या संदर्भातील बखरकारांनी दोन कुळांतील भांडणांच्या दिलेल्या कथा आणि पुढील कथित वैमनस्य पूर्णपणे निराधार आहे. अव्वल पुराव्यांच्या आधारे हा विवाह चांगल्या वातावरणात, आनंदाने व रूढीनुसारच पार पडला असे निश्चितपणे म्हणता येते.

## जाधव–भोसले वैमनस्य

जिजाऊच्या विवाहानंतर मात्र सुमारे तेरा वर्षांनी या दोन घराण्यांमध्ये वैमनस्य निर्माण करणारी घटना दौलताबाद येथे घडली. एक दिवस लखुजी जाधवराव व शहाजीराजे निजामशहाचा दरबार सुटल्यानंतर जलदीने घरी परतत होते. इतर सरदार मंडळीही घाईघाईने परतू लागली. कोणी घोड्यावरून, कोणी हत्तीवरून तर कोणी पालखीमधून परतले. रस्त्यावर एकच गर्दी उसळली होती. त्या वेळी खंडागळ्यांचा आघाडीचा हत्ती अकस्मात बिथरला आणि दुसऱ्यांची सैन्ये तुडवीत वेगाने निघाला. तो आपल्या रोखाने धावून येत असलेला पाहून जिजाऊचा बंधू दत्ताजी जाधवराव याने आपल्या सनिकांना त्या हत्तीला अडविण्याची आज्ञा केली. पण मदोन्मत्त हत्तीपुढे कुणाचीच मात्रा चालली नाही. तेव्हा दत्ताजी त्वेषाने स्वत:च हत्तीवर चालून गेला. आपल्या तरवारीने त्याने त्या हत्तीला चांगलेच रक्तबंबाळ केले. आपला हत्ती वाचविण्यासाठी खंडागळे मध्ये पडला. विठोजीराजे भोसलेंचे दोन पुत्र संभाजी व खेळोजी हेही त्याच्या मदतीला धावले. पण दत्ताजीने एव्हाना हत्तीची सोंड कापून काढली होती. तो आता संभाजी भोसल्यावर तुटून पडला. दोन्ही पक्षांकडील सैनिकही आपापल्या धन्याच्या मदतीस धावले. शहाजीराजेही आपल्या चुलत बंधूंच्या रक्षणार्थ धावले. अखेर संभाजी भोसल्याकडून दत्ताजी ठार झाला. जिजाऊचा थोरला बंधू शहाजीराजांच्या चुलत भावाने ठार केला.

लखुजीराजे पुढे निघून गेले होते. पुत्रवधाची बातमी कळली तसे ते रागाने माघारी वळले. त्यांना रोखण्यासाठी शहाजीराजे सामोरे आले. पण लखुजींनी त्यांच्या दंडावर तरवारीचा एक प्रहार करून त्यांना मूर्च्छित केले. लखुजींनी सरळ संभाजीवर हल्ला चढविला आणि त्याला ठार मारून पुत्रवधाचा बदला घेतला.

(दिनांक २० ते २७ फेब्रुवारी १६२३ च्या दरम्यान) दत्ताजीची समाधी पुढे सिंदखेडला बांधली गेली.

### लखुजींची पुत्रांसह हत्या

या घटनेनंतर उण्यापुऱ्या सहा वर्षांनी दौलताबाद येथेच निजामशहाने लखुजींची रघोजी, अचलोजी या पुत्रांसह व यशवंतराव नामक नातवासह दिनांक २५ जुलै १६२९ रोजी निर्घृण हत्या केली.

श्रावणी पौर्णिमेचा (रक्षाबंधनाचा) दिवस होता. लखुजी निजामशहाच्या मुजऱ्यासाठी दौलताबादला आलेले होते. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी म्हाळसाबाई (जिजाऊची आई), भाऊ जगदेवराव, पुत्र अचलोजी, रघोजी व बहादूरजी (हा जगदेवरावांना दत्तक दिलेला होता) आणि नातू यशवंतराव असा सर्व परिवार होता. या सर्व कुटुंबाचा मुक्काम किल्ल्याच्या पायथ्याशी कुतलघखानाच्या हौदाजवळ होता. पत्नीला, भावाला व बहादूरजीला मुक्कामावर ठेऊन अन्य सर्वजण लखुजींसह मुजऱ्यासाठी गडावर गेले. निजामशहाला त्यांनी मुजरा केला. पण काहीच वास्तपुस्त न करता निजामशहा सिंहासनावरून उठून त्वरेने आत निघून गेला. तेवढ्यात फर्रादखान, सफदरखान, मोतीखान हे आपल्या साथीदारांसह अकस्मात लखुजी व त्यांच्या परिवारावर तुटून पडले. काहीशा प्रतिकारानंतर सारे जाधवराव कुटुंब मारले गेले. दिवसाढवळ्या भर दरबारात जाधवराव कुटुंबाची भीषण कत्तल उडाली.

ही दुःखद वार्ता तळाशी पोहोचताच म्हाळसाबाई, जगदेवराव व बहादूरजी तातडीने सिंदखेडच्या रोखाने धावत सुटले. पुढे प्रेतांची विल्हेवाट लावल्यानंतर लखुजींचे भव्य स्मारक सिंदखेडला उभारण्याचे जगदेवराव व बहादूरजी यांनी ठरविले. हे स्मारक आजही उत्तम स्थितीत उभे आहे.

### जिजामाता व बाल शिवबा सिंदखेडला येतात

पित्याच्या व बंधूंच्या मृत्यूमुळे शोकग्रस्त झालेल्या जिजाऊसाहेब या वेळी गरोदर असून शिवनेरीवर मुक्कामास होत्या. दिनांक १९ फेब्रुवारी १६३० रोजी येथेच त्यांच्या पोटी शिवराय जन्मास आले. बाळंतपण व नंतरच्या सार्वत्रिक गोंधळामुळे जिजाऊसाहेब दुखवट्यासाठी लगेच सिंदखेडला येऊ शकल्या नाहीत.

त्या इ. स. १६३२-३३ मध्ये माहेरी आल्या. त्यांच्यासोबत दोन-तीन वर्षांचे लहानगे शिवबाराजेही सिंदखेडला मातुलगृही आले. सिंदखेडला या माय-लेकरांचा मुक्काम सुमारे दोन वष होता.

**जाधवरावांचे सिंदखेडराजा**

लखुजीराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधू जगदेवराव यांनी सिंदखेडला कारभार सांभाळला. त्यांनीच लखुजींचे भव्य स्मारक उभारण्याचे कार्य सुरू केले. त्यांचा मृत्यू दिल्लीला इ.स. १६३३ च्या ऑक्टोबरच्या सुमारास झाला.

याच काळात जाधवरावांच्या चार शाखा सिंदखेडच्या परिसरातील अडगाव, मेहुणे, किनगाव व सिंदखेडराजा या ठिकाणी पसरल्या. लखुजींच्या पुत्रांपैकी दत्ताजीची शाखा अडगाव येथे, अचलोजीची शाखा मेहुणे येथे, बहादूरजीची शाखा किनगाव येथे तर रघोजीची शाखा सिंदखेडराजा येथे स्थायिक झाली. सिंदखेडकर जाधवराव पुढे देऊळगावराजा येथे वस्तीस आले.

लखुजी जाधवरावानंतर सिंदखेडची अशी प्रचंड भरभराट झाली ती राव जगदेवाच्या कारकिर्दीत. राव जगदेवाचा काळ इ.स. १६६५ ते १७०० असा असून तो रघोजीचा पणतू किंवा लखुजीराजांचा खापर पणतू होता. या राव जगदेवानेच सिंदखेडला काळा कोट, चांदणी तलाव, मोती तलाव, राय बारव, बाळसमुद्र, गंगासागर, अन्नछत्र, सजना बारव या वास्तू, बारवा व तलाव बांधले. नळाचे पाणी राजवाड्यापर्यंत आणण्याचे श्रेयही त्याच्याकडेच जाते. याशिवाय रायबाग, कुंजवन व रघुवन या अप्रतिम बागाही त्यानेच उभारल्या. सिंदखेडप्रमाणेच पळसखेड, तुळजापूर, जानेफळ येथेही राव जगदेवाने गढ्या उभारल्या. राव जगदेवाच्या हातून घडलेले आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे देऊळगाव येथे त्याने केलेली श्रीव्यंकटेशाची स्थापना.

शिवकाळात प्रामुख्याने जाधवराव घराण्यामुळेच सिंदखेडला ऊर्जितावस्था प्राप्त झाली. शौर्य, मुत्सद्देगिरी, कर्तबगारी, सर्वधर्मसमभाव व उच्च दर्जाची रसिकता यांचा मनोज्ञ संगम जाधवरावांच्या ठायी होता. जाधवरावां-मुळेच सिंदखेडचे नाव संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्ली, काबूलपर्यंत मशहूर होते.

राव जगदेवाचा मुलगा यशवंतराव हाही कर्तबगार होता. त्याच्या काळात सिंदखेडचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर भरभराटीस आला होता. त्या काळात पुणे–नागपूर रस्ता सिंदखेडावरूनच जात असे. तो आजही 'नागपूर डाक लाईन' या नावाने प्रसिद्ध आहे. या महत्त्वाच्या मार्गामुळे सिंदखेडचा व्यापार उदीम खूपच वाढला. कासार, वाणी, सावकार यांचे प्रचंड वाडे येथे उभे होते. राव जगदेवाच्या पुढच्या पिढीतील रघोजीराव जाधवाच्या काळात सिंदखेडचा कापडाचा व्यापारही प्रसिद्ध होता.

सिंदखेडकर जाधवरावांनी अनेक लढायांत संस्मरणीय पराक्रम गाजवून सिंदखेडचे नाव इतिहासात अजरामर केले. इ. स. १६६५ साली झालेल्या कलबुर्ग्याच्या लढाईत लखुजीराजांचा नातू (रघोजीचा वंश) दत्ताजी व पणतू रघोजी व यशवंतराव यांनी पराक्रम गाजवून धारातीर्थी देह ठेवले तर, इ. स. १७२४ साली झालेल्या साखरखेडर्याच्या विख्यात लढाईत मोगलांच्या वतीने निजामाविरुद्ध लढताना राव जगदेवाचा पुत्र रघोजी प्रचंड पराक्रम गाजवून रणांगणी पडला. या लढाईत निजामाला विजय प्राप्त झाला व या वेळेपासूनच त्याला दक्षिणेत कायमचे स्वतंत्र राज्य लाभले. निजामाला या युद्धात बाजीराव पेशव्याची पूर्ण साथ होती. योग असा की, या लढाईनंतर उण्यापुऱ्या बत्तीस-तेहतीस वर्षांनीच निजाम व पेशवे यांची भीषण लढाई सिंदखेड येथे झाली (डिसेंबर १७५७). या युद्धात रामचंद्रराव जाधव निजामाच्या बाजने लढत होता तर मराठ्यांच्या बाजूने दत्ताजी शिंदे, नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ लढत होते. मराठ्यांनी यावेळी सिंदखेडची गढी सुमारे महिनाभर वेढली होती. रामचंद्र जाधव आत कोंडला गेला. जाधवरावांचा एक सहकारी नागोजी माने याच लढाईत सिंदखेडला मारला गेला.

इ. स. १७४३ पासून इ. स. १८०३ पर्यंत सिंदखेड शिंद्यांच्या ताब्यात होते. आसईच्या लढाईनंतर ते निजामाकडे व नंतर इंग्रजांकडे गेले.

निजामाच्या ताब्यात गेल्यानंतर सिंदखेडची कळा पार बदलून गेली. इ. स. १८०४ मध्ये लॉर्ड वेलेस्ली याने सिंदखेडचे वर्णन 'चोरांचे पेव', 'लुटारूंची गुहा' या शब्दांत केलेले आहे. या काळात मोहनसिंग खडलामशा, गाझीखान इत्यादी लुटारूंनी एवढा धुमाकूळ मांडलेला होता की, त्यांची नावे ऐकताच लोकांच्या

अंगात विलक्षण कापरे भरत असे. जाधवरावांचा पूर्वीचा दरारा व वैभव या काळात पार नष्ट झाले. जाधव कुळातील शेवटचा वंशज राजे बाजीराव हा डिसेंबर १८५९ मध्ये इंग्रजांच्या कैदेत नष्ट झाला आणि सिंदखेडचे इतिहास पटलावरील महत्त्वही या वेळेपासून कमी होत गेले.

जाधवराव-भोसले नातेसंबंध जिजाऊसाहेब व शहाजीराजांपासून प्रस्थापित झाला. हा संबंध पुढील पिढ्यांमध्येही कायम राहिला. पर्यायाने जाधव कुळाचे व सिंदखेडचे महत्त्वही हिंदवी स्वराज्याच्या इतिहासात या ना त्या प्रकारे कायम राहिले. शहाजीराजे हे लखुजीराजांचे जावई होते. शिवाजीमहाराजांचे पौत्र शाहूराजे भोसले हेही सिंदखेडकर जाधवरावांचे जावई होते. मानसिंगराव रुस्तुमराव जाधव यांची मुलगी अंबिकाबाई ऊर्फ राजसबाई ही शाहूराजांना दिलेली होती. तिचा मृत्यू दिल्लीलाच झाला. या उलट सिंदखेडकर रघोजी ऊर्फ बापूसाहेब जाधवराव हे शिवाजीमहाराजांचे नातजावई होते. शिवाजीमहाराजांचे दुसरे पुत्र रामराजे यांची कन्या अंबिकाबाई ही रघोजी जाधवरावांची पत्नी होती. या रघोजीचा पुत्र बावजी हा आपल्या मामांकडे म्हणजे शाहूराजांकडेच वाढला. शाहूराजांचे त्याच्यावर फार प्रेम होते. पुढे बावजी जाधवराव हा पेशव्यांविरुद्ध ताराबाईच्या पक्षाचा प्रमुख मुत्सद्दी झाला. मराठ्यांचा सुप्रसिद्ध सेनापती धनाजी जाधवराव हाही सिंदखेडच्या घराण्यातीलच होता.

जाधव-भोसले घराण्यांतील या पिढीजात संबंधामुळे स्वाभाविकच सिंदखेडचे नाव राजकीय क्षितिजावर सुमारे तीनशे वर्षे सतत तळपत होते.

जाधवरावांच्या काळात सिंदखेडला अनेक इतिहासप्रसिद्ध व्यक्ती येऊन गेल्या. मालोजीराजे भोसले, विठोजीराजे भोसले, शहाजीराजे भोसले, शिवाजीमहाराज, दत्ताजी शिंदे, नानासाहेब पेशवे, सदाशिवराव भाऊ पेशवे, दुसरा बाजीराव, निजाम अली उलमुल्क, इब्राहिमखान गारदी, विठ्ठलसुंदर दिवाण व लॉर्ड वेलेस्ली ही त्यांपैकी काही नावे सांगता येतील. सुप्रसिद्ध शाहीर रामजोशी याने एका कवनात देऊळगावचा उल्लेख केला आहे. तोही सिंदखेडला येऊन गेला असल्याची शक्यता आहे. याशिवाय पेशव्यांकडील तसेच नागपूरकर भोसल्यांकडील काही सरदार मंडळीही प्रसंगोपात्त सिंदखेडला येऊन गेली असावीत असे वाटते.

त्यांची किंवा जाधवरावांची पदचिन्हे आज काळाच्या ओघात पुसली गेली असली तरी यादवकुळाच्या राजवैभवाची साक्ष देणारी अनेक स्मारके, प्रासाद, महाल, मंदिरे, तलाव, जलविहाराची ठिकाणे ऊन-पावसाचा मारा सोशीत सिंदखेडला उभी आहेत. अवशेष रूपातील या स्मृतिचिन्हांचे आजचे भग्नावस्थेतील दर्शनही त्या वेळी ती उभारणीसाठी लागलेले द्रव्य, कौशल्य, परिश्रम, सामर्थ्य, जिद्द व रसिकता यांचे परिचायक असून मनाला थक्क करून सोडणारे आहे. शिवकालीन विदर्भात वास्तुशास्त्र किती प्रगतावस्थेत होते हे सिंदखेडच्या वास्तूंवरून सहज लक्षात येईल.

□ □

# सिंदखेड दर्शन

**मार्ग**

सिंदखेडराजा बुलढाणा जिल्ह्यात असून नव्या महसूल रचनेत ते तालुक्याचे ठिकाण झालेले आहे. बुलढाण्याच्या दक्षिणेस सरळ रेषेत सुमारे ६४ किलोमीटर अंतरावर असलेले सिंदखेड कुठल्याच मुख्य रस्त्यावर नाही. सिंदखेडला जायचे तर औरंगाबाद–खामगाव या बसमार्गावर देऊळगावराजा या ठिकाणी उतरावे लागते. देऊळगावच्या आग्नेयेस सिंदखेडचा फाटा फुटतो. देऊळगावराजा ते सिंदखेडराजा अंतर १३ किलोमीटर पडते.

सिंदखेडला जाण्यासाठी आणखी दोन मार्ग आहेत. पहिला माग म्हणजे मेहेकरकडून दुसरबीडहून येणारा तर दुसरा मार्ग म्हणजे जालन्याहून सिंदखेडला येणारा मार्ग. पहिल्या मार्गाने मेहेकरहून सिंदखेडराजा अंतर सुमारे ५६ किलो-मीटर पडते. तर दुसऱ्या मार्गाने जालना–सिंदखेड अंतर सुमारे ३२ किलोमीटर पडते. सिंदखेडराजा मेहेकरच्या नैऋत्येस तर जालन्याच्या ईशान्येस आहे.

सिंदखेडला येण्यासाठी लोहमार्गावरील जवळचे ठिकाणही जालना हेच आहे. मनमाड–पूर्णा या लोहमार्गाने जालन्यास उतरून मोटारीने सिंदखेडला जाता येते. मुंबई–कलकत्ता या मध्य रेल्वेच्या मुख्य लोहमार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशाला शेगाव येथे उतरून खामगाव व तेथून देऊळगावला येऊन पुढे सिंदखेडला येणे त्यातल्यात्यात सोयीचे आहे.

विमानमार्गाचा विचार केल्यास सिंदखेडसाठी जवळचा विमानतळ औरंगाबाद आहे.

सिंदखडराजाची लोकसंख्या सुमारे दहा हजार असून तोंडवळा ग्रामीण क्षेत्रा-तील विकसनशील खेड्याचा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**प्रेक्षणीय स्थळ**

सिंदखेडराजा या ऐतिहासिक गावातील महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे म्हटली म्हणजे जिजामातेचा जन्म झाला तो जाधवरावांचा राजवाडा किंवा गढी, रंगमहाल,

काळा कोट, लखुजीराजांची समाधी, मोतीतलाव, चांदणी तलाव, पुतळा बारव, सजना बारव, बाळसमुद्र, गंगासागर, रामेश्वर, रेणुका व नीळकंठेश्वराची मंदिरे इत्यादी सांगता येतील. याशिवाय सावकारवाडा, राम बारव, अन्नछत्र विहीर, नृत्य महाल ह्या वास्तूही उल्लेखनीय आहेत.

**लखुजीराजांचा राजवाडा**

बसस्थानकापासून पूर्वेकडे थोडे चालत गेल्यानंतर उजव्या अंगाला एक विस्तीर्ण पटांगण लागते. त्याला लागून उत्तराभिमुख एक दगडी, प्रचंड दरवाजा दिसतो. तेच लखुजीराजांच्या राजवाड्याचे किंवा गढीचे प्रवेशद्वार. प्रवेशद्वार तीन मजली असून खाली देवड्या, त्यावर नगारखाना व त्यावर संरक्षक भिंती उभारलेला सज्जा असे दरवाजाचे स्वरूप आहे.

प्रवेशद्वाराची दर्शनी चौकट दगडी असून अतिशय मजबूत आहे. या दगडी चौकटीवरील कोरीव काम प्रेक्षणीय आहे. दगडी कमानीच्या दोन्ही अंगास दोन देखणी कमळाची तवके कोरलेली आहेत. प्रवेशद्वाराचे उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे अन्यत्र फारसे पाहावयास न मिळणारे दगडी नारळांचे तोरण ! चौकटीवर दगडात कोरलेले १४ नारळ म्हणजे कारागिरीचा दुर्मिळ नमुना म्हणावा लागेल. आता फक्त एक दोनच नारळांच्या शिल्पाकृती मूळ स्वरूपात कायम असून अन्य नारळ महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने १९७४ साली लावलेले आहेत.

प्रवेशद्वाराचे मूळचे दरवाजे नष्ट झाले आहेत. प्रवेशद्वाराच्या इमारतीची एकूण उंची (तीन मजले मिळून) वरच्या संरक्षक भिंतीपासून ११.६५ मीटर असून प्रवेशद्वाराच्या कमानीची उंची ४.०५ मीटर व रुंदी २.८० मीटर आहे. दरवाजाच्या आत शिरले की पूर्वेच्या अंगास दोन व पश्चिमेच्या अंगास एक देवडी लागते. पूर्वेकडील दोन देवड्यांच्या मधून पुढे सरकल्यास राजवाड्याकडे जाणारे उपद्वार लागते. पूर्वेच्या देवडीवरूनच नगारखान्याकडे जाणारा जिना लागतो.

नगारखान्याची लांबी ११.४० मीटर व रुंदी १०.८५ मीटर असून उंची (छतापासून) ३.५० मीटर आहे. नगारखान्याचे बांधकाम कमानी असून एकूण कमानी २४ आहेत. कमानीची उंची २.६५ मीटर आहे. नगारखान्यात

कमानींमुळे दालने निघालेली आहेत. नगारखान्यात आतील भागाला पश्चिमेकडे एक न्हाणीघरही दिसते. जाधवरावांच्या काळी या नगारखान्यावरून चौघडा वाजत असे.


नगारखान्यावरून गच्चीवर जाण्यासाठी पूर्वेच्या अंगाने जिना आहे. गच्चीची लांबी १२.१५ मीटर व रुंदी ११.०५ मीटर आहे. गच्चीला चारही बाजूंनी १.९५ मीटर उंचीची संरक्षक भिंत उभारलेली असून तीत झरोक्यांसोबतच मारा करण्यासाठी जांघ्याही काढलेल्या आहेत.

राजवाड्याची एकूण लांबी १०२.२० मीटर व रुंदी ९० मीटर असून तटांची उंची ७ मीटर भरते.

राजवाडा दोन भागांत विभागलेला असून या विभागांना विभागणारी भिंत आता जवळजवळ भुईसपाट झालेली आहे. या विभागणाऱ्या भिंतीतही कमानी दरवाजे असावेत. या भिंतीमुळे राजवाड्याचे दोन भाग पडतात. पहिला पूर्वेकडील व दुसरा पश्चिमेकडील. मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरताच समोर जे अवशेष दिसतात, ते पश्चिम भागाचे.


राजवाड्याच्या पूर्व भागात बहुधा जाधवरावांची सदर असावी. हा पूर्व भाग बह्वंशी भुईसपाट झालेला असून तेथे जाधवरावांची दरबाराची जागा असावी. ही उत्तराभिमुख असून उजव्या अंगाची खोली थोडीफार अस्तित्वात दिसते. डाव्या अंगाची खोली मात्र पूर्णपणे ढासळलेली आहे. बसण्याच्या जागे-समोर खाली चौक दिसतो. बैठकीची जागा उंचावर आहे.

मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश करताच समोर दगडी बांधकाम केलेले जोते दिसते. हा राजवाड्याचा पश्चिम भाग येथेच जाधवरावांचे राणीवसे व त्यांच्या निवासाची जागा असावी असे वाटते. जोते चौरसाकृती असून त्याची लांबी व रुंदी सारखीच म्हणजे ४०.२० मीटर (प्रत्येकी) आहे. निवासस्थान तीन मजली असून एकाखाली एक अशी दोन तळघरे व वर एक मजला असावा असे दिसते. प्रवेशद्वाराकडील दर्शनी भागाकडे म्हणजे उत्तरेकडून सलग भिंत बांधलेली होती. प्रासादात शिरण्यासाठी पूर्वेकडून प्रवेशद्वार होते. वरच्या मजल्यावर मध्यभागी चौक व त्याच्या चारही बाजूंना खोल्या काढलेल्या होत्या. चौक १७.५०×१७.५० मीटर आकाराचा चौरस असून चौकात उतरण्यासाठी




जिजामाता जन्मस्थान

पुतळा बारव







प्रवेशद्वार (नीळकंठेश्वर मंदिर)



हरिहर शिल्प (नीळकंठेश्वर मंदिर)




सजना बारव




रेणुकादेवी मंदिर

रंगमहाल (आतील भाग)







प्रवेशद्वार (नीळकंठेश्वर मंदिर)



हरिहर शिल्प (नीळकंठेश्वर मंदिर)




सजना बारव




रेणुकादेवी मंदिर

रंगमहाल (आतील भाग)






शिलालेख (नीळकंठेश्वर मंदिर)



चांदणी तलाव व महाल



रामेश्वर मंदिर

पूर्व, उत्तर व दक्षिण अंगाच्या कोपऱ्यांत पायऱ्या बांधलेल्या आहेत. चौकाच्या सभोवती बांधलेल्या खोल्यांचे बांधकाम दगडी असून लाकडी खांबावर ते उभे होते. काळजीपूर्वक पाहिल्यास काही न्हाणीघरे व कपाटांच्या जागा ओळखता येतात.

वरच्या मजल्याखालील तळघरांचा फक्त एक मजलाच आज मोकळा करण्यात आलेला असून त्या खालील मजला उत्खननाशिवाय दिसू शकणार नाही. आज जी तळघरे दिसतात ती राजवाड्याच्या जोत्याच्या पूर्व व पश्चिम अंगाला आहेत.

पूर्वेकडील तळघरे पूर्व व दक्षिणेकडे बांधलेली असून (⌈ या आकाराची) त्यामध्ये प्रवेश करण्यासाठी पूर्वेच्या अंगाने तीन व दक्षिणेच्या अंगाने एक असे एकूण चार दरवाजे आहेत. तळघरात प्रकाशासाठी तसेच हवा खेळती राहावी यासाठी झरोके काढलेले आहेत. तळघराची एकूण सात दालने आहेत. पूर्वेकडील पहिल्या दरवाजाने तळघरात प्रवेश केला की, १०.८०×४.२० मीटर क्षेत्रफळाचे दक्षिणोत्तर लांबीचे पहिले दालन पाहावयास मिळते. त्याला लागून १०.८०×३ मीटरचे दुसरे तसेच दालन आहे. या दालनात जायला तीन दरवाजे काढलेले आहेत.

पहिल्या दालनातून दक्षिणकडे पुढे सरकले की, ४.२०×३.१० मीटरचे पूर्व-पश्चिम लांबीचे तिसरे व त्याला लागूनच ३.१०×३ मीटरचे चौथे दालन दिसते. चौथ्या दालनात जायला तिसऱ्या दालनातून पश्चिमेकडे दार आहे. तिसऱ्या दालनाच्या दक्षिणेकडून पाचव्या दालनात प्रवेश करता येतो. पाचव्या दालनात प्रवेश करण्यासाठी पूर्वेकडूनही द्वार आहे. तसेच दक्षिणेकडून वरच्या मजल्यावर जायला रस्ता आहे. पाचवे दालन दक्षिगोत्तर लांबीचे असून त्याचे क्षेत्रफळ ८.३०×४.१५ मीटर आहे. पाचव्या दालनातून पश्चिमेकडील दरवाजातून आत शिरले की, सहाव्या दालनात प्रवेश होतो. सहावे व सातवे दालन पूर्व-पश्चिम लांबीचे असून त्यांची क्षेत्रफळे प्रत्येकी ७×४.१५ मीटर व ७.३ मीटर अशी आहेत. सहाव्या दालनातून सातव्या दालनात जायला उजव्या अंगाने दोन दरवाजे आहेत.

जोत्याच्या पूर्वेप्रमाणेच पश्चिम अंगासही पाच दालनांचे तळघर आहे. या तळघराचे स्वरूप प्रायः अंधारकोठडीसारखे आहे. या तळघरात उतरण्यासाठी

पश्चिमेकडून दरवाजा आहे. दालने दक्षिणोत्तर सरळ रेषेत बांधलेली आहेत. याच तळघरात जाधवरावांच्या खजिन्याची जागा दिसते. तळघराच्या भिंती दणकट व रुंद आहेत. तळघरात शिरले की, ४.१५ मीटर लांब व ३.०५ मीटर रुंद असलेले दालन लागते. या दालनाच्या डाव्या अंगाला ३.०५ X ३.०५ मीटर क्षेत्रफळाचे एक दालन आहे तर उजव्या अंगाला (दक्षिणेकडे) ७X३.०५ मीटर, ४.१५ X ३.०५ मीटर व ३.०५ X ३.०५ मीटर क्षेत्रफळ असलेली एकूण तीन दालने आहेत. दक्षिणेकडील दुसऱ्या दालनात पश्चिम बाजूच्या भिंतीत एक चौकोनी आकाराचा कोनाडा आहे. त्याच्या डाव्या अंगाला भिंतीत कमळ कोरलेले असून उजव्या अंगाला बाणाची खूण आहे. हा कोनाडा किंवा खिडकी ओलांडून आत भिंतीच्या पोकळीत शिरता येते. तीथे डाव्या हाताला हौद लागतो. ही जाधवरावांची गुप्तधन ठेवण्याची जागा दिसते.

सारांश, राजवाड्याची एकूण १२ दालने असलेले तळघरच आज सुस्थितीत आहे. त्या खालील तळघराचे अजून उत्खननच व्हायचे आहे तर पहिल्या मजल्याचे जोतेच तेवढे शिल्लक आहे. तरीही या प्रासादाची भव्यता कल्पनेने कुणीही मनाशी चितारू शकेल. बांधकामाचा विशेष लक्षणीय भाग म्हणजे जोत्याच्या पूर्वेकडील अंगास जे सात दालनांचे तळघर आहे. त्यात पश्चिम अंगाने झरोके काढलेले आहेत. हे झरोके वरच्या मजल्यातील चौकाच्या दिशेने उघडतात. चौकात त्या काळी पाणी असायचे. या पाण्यावरून आत सरकणाऱ्या थंडगार हवेमुळे तळघर थंड राहत असे. तत्कालीन वातानुकूलित रचना म्हणून त्याकडे आवर्जून पाहिले पाहिजे.

या राजवाड्याच्या नैऋत्य कोनाला म्हाळसा महाल होता व त्या महालातच जिजामातेचा जन्म झाला. जन्मस्थानाची नेमकी जागा पहिल्या मजल्यावर होती की खालच्या तळघरात होती हे मात्र नक्की सांगता येत नाही. पारंपरिक माहितीवरून आज एका कोपऱ्यातील खोलीवर जिजामाता जन्मस्थान अशी पाटी लावलेली दिसते. तेथे जिजामाता व बाल शिवबाचा शुभ्र पुतळा बसविलेला आहे.

हा अतिशय मजबूत वाडा लखुजीराजांनी बांधलेला आहे. या वाड्याचे बांधकाम इ. स. १५७६ च्या सुमारास झालेले असून जिजामातेचा जन्म याच ठिकाणी झाला. त्यांचे बालपण याच वास्तूत गेले तसेच दोन-तीन वर्षांचे वय

असलेले बाल शिवबाराजेही येथे काही काळ बागडलेले आहेत. स्वाभाविकच शिवभक्तांसाठी हे स्थळ दर्शनीय आहे.

राजवाड्याच्या पश्चिमेस लागूनच नृत्यमहाल किंवा कंचनीचा महाल या नावाने ओळखली जाणारी वास्तू आहे. सध्या तेथे पोलीस स्टेशन आहे. नृत्य-महालाच्या पाठीमागे काही अंतरावर सावकारवाडा दिसतो. सावकारवाड्याची वास्तूही भव्य आहे. ही वास्तू लखुजीराजांच्या कारकिर्दीनंतर बांधलेली आहे. सिंदखेडला वासुदेवसा, मुरारसा, नवलसा इत्यादी प्रसिद्ध सावकार होऊन गेले. त्यांचे जाधवरावांवर हजारो रुपयांचे कर्ज असे. स्वाभाविकच त्यांची वास्तू टोलेजंग होती. सावकारवाड्याची तटबंदी खालील अर्धा भाग चिरेबंदी व वरील अर्धा भाग विटांचे बांधकाम केलेली असून प्रवेशद्वारावरील विटांचे नक्षीकाम अतिशय सुंदर आहे.

### रंगमहल

राजवाड्याच्या पश्चिमेस सुमारे ४०० मीटर अंतरावर रंगमहालाची वास्तू उभी आहे. रंगमहालाचा पूर्वाभिमुख दर्शनी भाग पूर्णपणे कोसळलेला आहे. दुसऱ्या पूर्वाभिमुख प्रवेशद्वारातून रंगमहालात जाता येते. या प्रवेशद्वारातून आत शिरले की उजव्या, डाव्या व समोरच्या बाजूने देवडी लागते. डाव्या हाताने देवडी ओलांडून आत प्रवेश केला की रंगमहालाचा चौक लागतो. चौक चौरस आकाराचा असून त्याचे क्षेत्रफळ १२.५०×१२.५० मीटर आहे. चौकाच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण अंगाला सदरेचे बांधकाम होते. मूळ बांधकामापैकी आता फक्त पश्चिमेकडील बाजूच शिल्लक उरलेली आहे.

या पश्चिमेकडील दिवाणखान्याला दोन पडव्या असून दुसरी पडवी पहिल्या पडवीपेक्षा १५ सें.मी. उंचावर आहे. पहिल्या पडवीचे क्षेत्रफळ १२.५०×३.६५ मीटर आहे. या पडवीला समोर चार खांब असून दोन खांब भिंतीत बसविलेले आहेत. वरच्या पडवीला मात्र दोन जोडखांब मोकळे व दोन जोडखांब भिंतीत बसविलेले आहेत. हे लाकडी खांब दगडी बैठकीवर उभे असून त्यावर नक्षीकाम कोरलेले आहे. दगडी बैठकीवरही सुबक नक्षीकाम कोरलेले असून हे खांब अत्यंत देखणे वाटतात. पडवीचे छतही लाकडी असून त्यावर कोरीव काम केलेले आहे. या कोरीव कामाचे सौंदर्य वाढविण्यासाठी हस्तिदंताच्या शुभ्र पट्ट्या व फुले

छताला जोडलेल्या होत्या. छताच्या लाकडी कोरीव कामावर सोनेरी वर्ख दिलेला आणि त्याच्या जोडीला शुभ्र हस्तिदंताच्या पट्ट्या व फुले लावलेली असल्याने स्वाभाविकच छत किती देखणे दिसत असेल! दुर्दैवाने आता मूळ हस्तिदंती पट्ट्या व फुले अस्तित्वात नाहीत. तरीही क्वचित काही तुकडे दिसतात. कल्पना येण्यासाठी त्यांचाही उपयोग होऊ शकेल.

या दिवाणखान्याच्या वरच्या पडवीला दोन्ही अंगांनी (उत्तर व दक्षिण बाजूंनी) दोन खोल्या काढलेल्या असून उत्तरेकडील बाजूनेच वर जाण्यासाठी जिना आहे.

रंगमहालाच्या चौकाच्या पूर्वेकडे व पश्चिमेकडे तळघर आहे. पूर्वेकडील तळघरात एकूण ९ खोल्या असून त्यातून रंगमहालातील चौकाकडे जाता येत असे.

रंगमहालाचे बांधकाम पूर्णपण विटांचे असून चौथरा मात्र दगडी आहे. राजवाड्याच्या राणीमहालाची छोटी प्रतिकृती म्हणजे रंगमहाल असे म्हणायला हरकत वाटत नाही.

पारंपरिक दंतकथेनुसार एका रंगपंचमीला जिजाऊ व शहाजी यांनी बालपणी एकमेकावर रंग उडवला व लखुजीराजांनी 'जोडा छान शोभतो' असे उद्‌गार काढले ते याच रंगमहालात. रंगमहाल म्हणजे जाधवरावांची न्याय कचेरी किंवा सदर असावी असे वाटते.

**काळा कोट**

राजवाड्याच्या साधारणतः वायव्येस सुमारे ३०० मीटर अंतरावर काळा कोट उभा आहे. काळा कोट म्हणजे सिंदखेडकर जाधवरावांचे अर्धवट साकार झालेले स्वप्नच म्हटले पाहिजे. लखुजी जाधवरावांचा खापरपणतू राव जगदेव याने काळ्या कोटाचे बांधकाम सुरू केले होते. १०३.२० × ८५.१० मीटर क्षेत्रफळ असलेल्या प्रशस्त जागेवर त्याने एक बलदंड भुईकोट बांधायला घेतला. परंतु त्याच्या तटबंदीचे बांधकाम जेमतेम निम्म्यावर आले आणि मोगल बादशहाने पुढील बांधकाम करण्यास मनाई केली. संभाव्य धोका लक्षात आल्याने बादशहा सतर्क झाला. जाधवराव बंड पुकारतील अशी धास्ती त्याला वाटली व त्यामुळे लगेच काळ्या कोटाचे बांधकाम त्याने बंद पाडले.

जाधवरावांच्या बखरीत या संदर्भात असा उल्लेख आहे की, 'काळा कोट किला खडकावर सुरू करून काम सुरू केले. गुप्त नहरही बांधला. आतून काम

चिरेबंदी मजबूत (केले.) सीसे चिऱ्यास पाजून बाहेरून मातीच्या भिंती चालविल्या. कारण की पातशहाचे परवानगीखेरीज़ किला होत नाही. चवफेर भाला दिडभाला काम झाले तो अकवरनवीस याणे इतला पातशहास दिधला. तेथून चोपदार व हुकूम जाला जे 'किला करू नये'. आधीच मऱ्हाटे तलवार-बाहाद्दर जबरदस्त, त्यास किला जालियावर पातशहासी बदलतील अशी कलपणा घेऊन मना केले.'

काळा कोटाची बांधणी चौकोनी आकाराची असून चार कोपऱ्यांवर चार बुरूज बांधलेले आहेत. बुरूज वर्तुळाकार असून बुरुजाचा व्यास १० मीटर आहे.

तटबंदीची रुंदी तीन मीटर असून तटावरून एक बैलगाडी सहज चालू शकेल एवढी ती रुंद आहे. तटांची उंची ५.२० मीटर एवढी आहे. यानंतर काम बंद पडलेले आहे. तटबंदीचे ताशीव दगडी बांधकाम काही ठिकाणी उकळत्या शिशाच्या रसात केलेले आहे. प्रवेशद्वार पूर्वाभिमुख ठेवण्याची मुळात योजना असावी. पण प्रवेशद्वाराचे बांधकामच मुळात झालेले दिसत नाही.

तटबंदीवर जाण्यासाठी पश्चिम व दक्षिण बाजूच्या बुरुजांजवळ पायऱ्या आहेत. काळच्या कोटात गुप्त नहर आणून सोडल्याचे बखरकार लिहितो. तो नहर बहुधा दक्षिण तटबंदीत आणलेला असावा. कारण दक्षिण तटबंदीत एक विहीर दिसते. तलवार, भाला, जंबिया, फरशी यांसारख्या शस्त्रांना धार लावल्यानंतर ती धार उतरू नये म्हणून जे पाणी या शस्त्रांना पाजावे लागते तेच पाणी या विहिरीत आहे. शस्त्रांना हे पाणी पाजले असता शस्त्राची धार उतरत नाही असे सांगतात.

**लखुजीराजांची समाधी किंवा घुमट**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक पुरुषांच्या समाध्यांमध्ये शिल्पशास्त्रदृष्टचा अत्यंत प्रेक्षणीय असलेली अशी समाधी क्वचितच आढळावी. समाधीचे ताशीव चिरेबंदी बांधकाम आजतागायत बहुंशी कायम आहे. या वास्तूची बांधणी एखाद्या ओतीव शिल्पासारखी वाटते. अत्यंत सुबक व प्रमाणशीर असलेल्या या चिरेबंदी वास्तूची लांबी व रुंदी समान, चौरसाकार असून ती प्रत्येकी १६.४० मीटर भरते. भिंतीची उंची १४.५० मीटर आहे. वास्तूचे बांधकाम कमानी घाटाचे असून एकूण २४ कमानींवर वास्तू उभारलेली दिसते.

समाधीस्थानाचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून दक्षिण व उत्तर बाजूला दोन उपद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला हत्तीवर आरूढ झालेल्या सिंहाच्या दगडी शिल्पाकृती कोरलेल्या असून भिंतीच्या दर्शनी भागावर गणेशपट्टी व अनेक मूर्ती कोरलेल्या दिसतात. मूर्तीप्रमाणेच कमळांची तबके व वेलबुट्टीही दगडात कोरलेली आहे.

गावाच्या पश्चिमेस जाधवरावांची स्मशानभूमी होती. तेथेच लखुजींची समाधी बांधलेली आहे. समाधीची बांधणी एखाद्या स्मृतिमंदिरासारखी म्हणावी लागेल. मंदिराचे जसे देव्हारा, गाभारा, कळस असे भाग असतात तसेच या समाधिस्थानाचेही आहेत. प्रथम मध्यभागी एक घुमट बांधून त्यात एक छोटा चौरस चौक काढला. या चौकाचे क्षेत्रफळ ३.५५×३.५५ मीटर आहे. या चौकात लखुजीराजांची समाधी करून त्यावर एक उत्तराभिमुख, १.६० मीटर लांबीचे शिवलिंग स्थापन केले. घुमटाच्या पश्चिम भिंतीत २.५०×१.५० मीटर क्षेत्रफळाची खोली काढलेली असून तीत सुमारे एक मीटर उंचीचा सिंहासनारूढ असलेल्या लखुजीराजांचा पुतळा वसविलेला होता. दुर्दैवाने आज हा पुतळा अस्तित्वात नाही. कुणीतरी तो तेथून हलवून नेला आहे. प्रत्यक्ष समाधीच्या घुमटाला चार भिंती असून शंकराच्या पिंडीकडे चौकात उतरण्यासाठी असलेले मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. दुसरे उपद्वार दक्षिणेकडील भिंतीत आहे.

प्रत्यक्ष समाधीच्या या घुमटाच्या चौकाला देव्हारा म्हणता येईल. या देव्हाऱ्याच्या भिंतीच्या चौफेर स्मृतिमंदिराचा गाभारा आहे. गाभाऱ्याच्या चार कोपऱ्यांत चार खोल्या करून त्यात छोटी शिवलिंगे स्थापन केलेली आहेत. प्रवेशद्वारातून आत शिरताच डाव्या अंगाला पहिली खोली दिसते. ती दत्ताजीची स्मृति-समाधी आहे असे मानले जाते. (खंडागळ्यांच्या हत्ती प्रकरणी दत्ताजी दौलताबादला मारला गेल्याचे मागे लिहिलेले आहेच.) उर्वरित तीन स्मृति-समाध्या अनुक्रमे अचलोजी, रघोजी व यशवंतराव यांच्या आहेत असे सांगतात. हे तिघेही लखुजींसोबतच इ. स. १६२९ साली दौलताबादला मारले गेले.

गाभाऱ्याच्या भिंतींना म्हणजेच समाधिस्थानाच्या दर्शनी भिंतींना तीन दरवाजे असून मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख तर अन्य दोन उपद्वारे दक्षिण व उत्तर भिंतीत काढलेली आहेत. पश्चिम भिंतीत छोटी देवळी काढलेली असून तेथील मूर्तीही हलवलेली दिसते. या देवळीवर गोपालकृष्णाची शिल्पाकृती कोरलेली

आहे. त्यावरून बखरीत उल्लेखलेल्या केशवराजाची मूर्ती येथे असावी असे वाटते.

मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरले की उजव्या हाताला (यशवंतरावाच्या स्मृतिसमाधीच्या खोलीला लागून) गच्चीवर जाण्यासाठी केलेला दगडी जिना लागतो. जिना चढून वर गेले की प्रशस्त गच्ची लागते. मधोमध घुमटाचा कळस पाहायला मिळतो. हा कळस मात्र विटांनी बांधलेला असून त्यावर चुन्याची छपाई केलेली दिसते.

गच्चीवरून दुसरा एक जिना दक्षिणेकडे बांधलेला दिसतो. हा जिना दत्ताजीच्या समाधीच्या छतावर उतरतो.

लखुजीराजांच्या या समाधिस्थानावर बाहेरच्या भिंतीवर दोन शिलालेख कोरलेले आढळतात. पहिला शिलालेख मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूच्या दगडी खांबावर कोरलेला आहे. शिलालेख पाच ओळींचा असून मुळाबरहुकूम त्याचे वाचन खालीलप्रमाणे आहे :

**(ओळ पहिली)** सींदखेडचे देशमुख भानवसे वीटोजी सौ

**(ओळ दुसरी)** अरधांगी ठाकराईराणी त्यांचे पोटी जाधवराव लुकजी म

**(ओळ तिसरी)** हाराज अरधांगी गीरजाईराणी त्यांचे पोटी पुत्र दत्ताजी व

**(ओळ चौथी)** अचलाजी व राघोजीराजे व जाधवराव लखुजी व पु

**(ओळ पाचवी)** त्र दत्ताजी त्यांचे पोटी येसवंतराजे व लींबाजी

दुसरा शिलालेख उत्तरेकडील भिंतीवर कोरलेला असून तो फक्त दोनच ओळींचा आहे. त्याचे वाचन असे :

**(ओळ पहिली)** सींदखेडचे देशमुख भानवन्से वीटोजी त्यांचे अरधांगी

**(ओळ दुसरी)** ठाकराईरानी त्यांचे सुपुत्र लुखजी जाधवराव महा-(राज)

दिनांक २५ जुलै १६२९ रोजी निजामाने लखुजीराजांची पुत्रपौत्रासह दौलताबादला निर्घृण हत्या केली. या हत्याकांडात लखुजीसोबत त्यांचे रघोजी व अचलोजी हे दोन पुत्र व यशवंतराव हा त्यांचा एक नातू मारला गेला. या दु:खद घटनेनंतर लगेच या समाधिस्थानाचे बांधकाम लखुजीचे बंधू जगदेवराव यांनी सुरू केले. या अप्रतिम स्मारकाच्या बांधकामाची जबाबदारी कृष्णा कारागिराने उचलली. त्याच्या दिमतीला २१ कारागीर दिलेले होते. तिसऱ्या दिवशी एक मोहोर याप्रमाणे कृष्णा कारागिराची मजुरी ठरली. स्मारक

उभारणीसाठी एकूण दहा वर्षे लागली. यांपैकी तीन वर्षे केवळ लखुजीराजांच्या पुतळ्यासाठी लागली. रंगमहालाच्या लाकडी खांबांच्या दगडी बैठकींसाठी वापरलेल्या टोळंबी दगडाचाच उपयोग कृष्णा कारागिराने पुतळ्यासाठी केला. पीळदार दंड व मांड्या, रुंद भरदार छाती, विशाल, पाणीदार नेत्र, सरळ नासिका व मोठे झुपकेदार कल्ले, पीळदार मिशा, भव्य मस्तक, डोक्यावर पीळदार मराठी पगडी, मोठे कानचापे, मुखावर वीरतेज झळाळत असलेले, अंगात घोळदार अंगरखा, कमरेच्या शेल्यात तलवार बांधलेली अशा थाटात डावा गुडघा सिंहासनावर टेकून व डावा हात मांडीवर टेकून, उजवा गुडघा उभा करून, उजव्या हाती जंबिया धारण करून ऐटीत बसलेल्या लखुजीराजांचे मूर्तिमंत दर्शन या पुतळ्याच्या माध्यमातून कृष्णा कारागिराने घडविले होते. दुर्दैवाने एवढा महत्त्वाचा हा पुतळा अनेक वर्षांपूर्वीच गहाळ झालेला आहे.

समाधीचे बांधकाम संपत आले असतानाच कृष्णा कारागीर कळसावरून घसरून खाली पडला. या अपघातातच कालांतराने त्याचा मृत्यू झाला (इ.स. १६४० चा सुमार).

लखुजीराजांच्या स्मृतिमंदिराभोवती चौफेर जाई, जुई, मोगरा, गुलाब इत्यादी फुलझाडे व आंबे, बोरी, चिंचा, आवळी, रामफळ, बेली, कवठे, चंदन, सीताफळ, केळी, सुरू, लिंबोणी, दाळिंबे, नारळी, ताड इत्यादी वृक्ष लावलेले होते. राम बारवेचे पाणी या बागेला दिले जाई. स्मृतिमंदिराची व्यवस्था नीट लागावी यासाठी पूजावतन भाटाकडे, साफसफाईचे वतन भोयाकडे तर पहाऱ्याचे वतन कोळ्यांकडे दिलेले होते.

लखुजीराजांच्या स्मारकासमोरच जाधव घराण्याची स्मशानभूमी असून तेथे या घराण्यातील काही मंडळींच्या समाध्या व सतिशिला आहेत. यांपैकी एका सतिशिलेवर चार ओळींचा शिलालेख कोरलेला आढळतो. त्याचे वाचन असे :

(ओळ पहिली) ।। **सके १६३७ मनमथ नाम संवतसरे आ**

(ओळ दुसरी) ।। **शिव (न) सुधि दशमी ते दिवशी मोरतब ।।**

(ओळ तिसरी) **षंडोजी याधव अरधंगी सोरबाबाई**

(ओळ चौथी) **सती ।। सेवक तेजजी नारायणजी जाधो**

सतीचे हे वृंदावन पूर्वाभिमुख असून आत अश्वारूढ वीराची व सतीच्या पंजाची पाषाणशिला बसविलेली आहे.

उर्वरित समाध्या पुरुषांच्या दिसतात. लखूजीच्या व्यतिरिक्त या सर्व समाध्यांची एकूण संख्या अकरा भरते.

**मोती तलाव**

गावाच्या पश्चिमेस सिंदखेड–जालना बसमार्गावर रस्त्याला लागून असलेला (उजव्या अंगाने) मोतीतलाव म्हणजे शिवकालीन विदर्भातील जलयांत्रिकीचा (Water Works Engineering) एक उत्कृष्ट नमुना आहे. हा तलाव राव जगदेवाने बांधलेला असून त्यासाठी सहा लक्ष रुपये खर्च आल्याचे बखरीत नमूद केलेले आहे. या तलावाचा मुख्य हेतू नजीकच्या भागातील शेतीला पाणीपुरवठा करणे हाच प्रामुख्याने दिसतो. मोती तलावाकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या पाण्याचा दांड सडकेखालील शेतीला भिजविताना आजही दिसतो.

स्थापत्यशास्त्रीय दृष्टीने मोती तलावाचे बांधकाम दोन विभागांत वर्णन करावे लागेल. पहिला विभाग म्हणजे बंधाऱ्याचे बांधकाम व दुसरा विभाग म्हणजे गच्चीखालील महालाचे बांधकाम.

बंधाऱ्याची भिंत २५८ मीटर लांब व ३.५ मीटरपासून १८ मीटरपर्यंत रुंदी असलेली आहे. सडकेकडून तिची उंची १.८० मीटरपासून ३.६० मीटर-पर्यंत असून पाण्याकडून उंची १४ मीटरपासून २ मीटरपर्यंत कमी होत आलेली दिसते. बंधाऱ्याची भिंत पक्क्या ताशीव दगडांनी बांधलेली असून बांधकामात वापरलेले दगड प्रामुख्याने जुन्या हेमाडपंती मंदिराच्या बांधकामातील दिसतात. मंदिराच्या कोरीव खांबाचे तुकडे आडवे लावलेले दिसतात. काही दगडांवर शिल्पाकृती कमळे कोरलेली आहेत. पश्चिमेकडून पाण्याच्या बाजूला बऱ्याच देखण्या स्त्रीमूर्ती पाहायला मिळतात. तलावात चार विहिरी खोदलेल्या असून बुरूजही दिसतात.

बंधाऱ्याच्या भिंतीला चौकोनी आकाराची जलद्वारे (Sluice Gates) वेगवेगळ्या पातळीवर बांधलेली असून ती उघडण्यासाठी वा बंद करण्यासाठी झडपांची व्यवस्था केलेली होती. या झडपांचे नियंत्रण बंधाऱ्याच्या भिंतीवरील गच्चीवरून केले जाई.

सरासरी ३.५ मीटर रुंदी असलेल्या बंधाऱ्याच्या भिंतीच्या मध्यभागी १८×१७.२५ मीटर क्षेत्रफळाचा एक महाल बांधलेला आहे. महालाचे

मुख्य प्रवेशद्वार सडकेला लागून पूर्वाभिमुख बांधलेले आहे. यातून प्रवेश करताच महाल लागतो. महाल १०×१० मीटरचा चौरस बांधलेला असून त्याची उंची ३.५ मीटर आहे. महालाचे बांधकाम कमानी असून एकूण २४ कमानींवर तो उभा आहे. महालाच्या मध्यभागी चौक असून त्याच्यामध्ये अष्टकोनी विहिरीवजा मोकळे बांधकाम केलेले दिसते. आत प्रकाश व हवा जाण्यासाठी त्याचा उपयोग होत असावा. कदाचित येथे त्या काळी पवनचक्कीही बसविलेली असावी.

महालात एकूण चार जिने असून दोन वर गच्चीवर जातात तर दोन पाण्याच्या पातळीपर्यंत खाली उतरतात.

मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या अंगाला दुसरे छोटे द्वार असून त्यातून तीन मार्ग गेलेले आहेत. पहिला मार्ग महालाकडे जातो. दुसरा पाण्याच्या पातळीपर्यंत जातो व तिसरा गच्चीवर जातो.

गच्ची चुना व दगडात पक्की बांधलेली असून जलद्वारांचे नियंत्रण करणाऱ्या झडपांसाठी केलेली व्यवस्था येथून दिसू शकते. झडपा दोन पातळ्यांवर होत्या. तलावात ज्या वेळी भरपूर पाणी असेल त्या वेळी वरच्या पातळीवरील झडपांचा उपयोग केला जाई. त्या उघडून जलद्वारे मोकळी केली जात. ज्या वेळी पाण्याची पातळी कमी कमी होई त्या वेळी खालच्या पातळीवरील झडपा उघडल्या जात.

झडपांचे दरवाजे एकाला एक लागून दुहेरी पद्धतीचे होते. वरच्या पातळीवरील जलद्वारांचे नियंत्रण करण्याची व्यवस्था पश्चिमेकडून तर खालच्या पातळीवरील जलद्वारांचे नियंत्रण करण्याची व्यवस्था त्याला लागूनच पूर्वेकडून केलेली होती.

**चांदणी तलाव**

देऊळगावाहून सिंदखेडला गावात शिरतानाच डाव्या हाताला हा तलाव दिसतो. समोरच सरकारी विश्रामगृहाची इमारत बांधलेली आहे. चांदणी तलावाचे बांधकामही शिवकालीनच आहे. राव जगदेवानेच हा तलाव बांधल्याचे बखरकार सांगतात. अंडाकृती आकाराच्या विस्तीर्ण चांदणी तलावाच्या मध्यभागी मजबूत दगडी चौथऱ्यावर दुमजली विटांची इमारत उभी होती. आता वरचा मजला कोसळला असून एक मजला मात्र शाबूत आहे. या इमारतीला सहा कमानी असून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिनाही काढलेला आहे.

V.P. Bhalerao

चांदणी तलाव ही राव जगदेवाच्या नौकाविहाराची जागा होती. आल्हाद-दायक चांदण्या रात्री चांदणी तलावात चांदणी महालाचे प्रतिबिंब पडलेले व सजणीसह राव जगदेव नौकाविहार करीत असलेला हे दृश्य कल्पनेनेच रंगवता येईल ! जाधवरावांच्या रसिकतेचा परिचय घडविण्यासाठी चांदणी तलाव अजूनही भग्नावस्थेत टिकून आहे.

चांदणी तलावातून राजवाड्यात पाणी नेण्यासाठी दगडी नळांची योजना केली होती. अजूनही या दगडी नळाचे फुटलेले अवशेष क्वचित पाहायला मिळतात.

**सजना बारव**

चांदणी तलावाला लागूनच असलेली पूर्वेकडील विहीर म्हणजे सजना बारव. मजबूत दगडी बांधकाम केलेली ही बारव मन मोहून टाकते. चिरेबंद बांधणीच्या या गोलाकार विहिरीचा व्यास (Diameter) ९.९० मीटर आहे. एकूण खोली (आजची) १३.७० मीटर असून विहिरीच्या आत जाण्यासाठी पूर्वेच्या अंगाने पायऱ्या खोदलेल्या आहेत. विहिरीवर दोन मोटा चालत. विहिरीच्या उत्तर अंगाने दोन ओवऱ्या काढून स्नानगृहाची व्यवस्था केलेली दिसते. सजना बारवेच्या पश्चिमेस एक कारंजेही आढळते. सजना बारव ही राव जगदेवानेच बांधली असल्याचे बखरीत नमूद केलेले आहे.

**पुतळा बारव**

राजवाड्याच्या ईशान्येस सुमारे अर्ध्या किलोमीटरवर पुतळा बारव पाहायला मिळते. ही बारव लखुजी जाधवांच्याही पूर्वीची असून तिचे बांधकाम १२ वे ते १३ वे शतक या दरम्यान झालेले आहे. बारव गोलाकार नसून अष्टकोनी दिसते. पूर्व-पश्चिम लांबी २०.७० मीटर असून पाण्यात उतरण्यासाठी पूर्व, पश्चिम व दक्षिणेकडून पायऱ्या काढलेल्या आहेत. उत्तरेकडील भाग कोसळलेला असल्याने तिकडून पायऱ्या होत्या की नव्हत्या हे निश्चित सांगता येत नाही.

पुतळा बारवेचा वरचा घाट बांधकामाच्या दृष्टीने दुर्मिळ स्वरूपाचाच म्हटला पाहिजे. सर्व बांधकाम दगडी असून त्यावर अनेक मूर्ती कोरलेल्या दिसतात. शिल्पाकृती हत्तींची रांग खोदून त्यावर स्तंभ खोदलेले व या स्तभांच्या दर्शनी भागावर देवादिकांच्या, मदनिकांच्या सुबक मूर्ती कोरलेल्या असे या बांधकामाचे

स्वरूप आहे. गणपती, तीर्थंकर इत्यादी मूर्ती लक्षणीय आहेत. पुतळा बारवेची खोली मात्र गाळ साचला असल्यामुळे नेमकी सांगता येत नाही.

**नीळकंठेश्वराचे देवालय**

पुतळा बारवेप्रमाणेच जाधव–पूर्वकालीन सिंदखेडचा जुना, अवशेष म्हणून नीळकंठेश्वर देवालयाकडे अंगुलीनिर्देश करता येईल. रंगमहालाजवळच दक्षिण अंगाला सुमारे १५० मीटर अंतरावर आठवडी बाजारालगत नीळकंठेश्वराचे देवालय दिसते. मुळात वैभवसंपन्न असलेल्या या देवालयाचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडून असावे. समोरच पुष्करिणी आहे. या पुष्करिणीलाच नीळकंठ बारव असेही म्हणतात. पुष्करिणीत उतरण्यासाठी चारही बाजूंनी घाट बांधलेले आहेत. पुष्करिणीचा आकार चौकोनी चौरसाकृती असून क्षेत्रफळ ३४ × ३४ मीटर आहे. पुष्करिणीच्या चारही बाजूंनी पूर्वी १५ शिवलिंगे स्थापलेली होती. सोळावी शिव-पार्वतीची मूर्ती पुष्करिणीच्या उत्तरेकडील भिंतीत स्थापलेली आहे. पुष्करिणीच्या पश्चिम तटावर भरवाची तसेच शनीची देवळी दिसते. ती ओलांडून पुढे सरकले की नीळकंठेश्वराच्या देवालयात प्रवेश होतो. नीळ-कंठेश्वराच्या पिंडीचे दर्शन घडविणारे द्वार पूर्वाभिमुख आहे. समोर नंदी दिसतो. नंदीच्या पाठीमागे एका दगडी खांबावर ११ ओळींचा एक शिलालेख कोरलेला असून त्यावरून या देवालयाचा जीर्णोद्धार जिजामातेचा बंधू रघोजी याने जिजामातेच्या जन्मापूर्वीच केला असल्याचे कळते. या महत्त्वपूर्ण शिलालेखाचे वाचन असे

**नीळ**<br>
**कंट**<br>
**श्रीगणेशाय न**<br>
**माः साके १५०९**<br>
**सार्वजीत सवत्स**<br>
**रे श्रावण सुदि पा**<br>
**डवा जीर्णोद्धार हे**<br>
**देऊळ धबांळे रा**<br>
**घोजी लुकजी जाधव**<br>
**श्रीदेक्षमुष परग**<br>
**णे सीधपुर**

नीळकंठेश्वराच्या देवालयाचे मूळ बांधकाम हेमाडपंती असून नंतर केलेला जीर्णोद्धार बांधकामावरून सहज लक्षात येतो.

नीळकंठेश्वराच्या देवालयामधील उत्तराभिमुख हरिहराची मूर्ती हा या देवळातील सर्वांत प्राचीन अवशेष म्हणावा लागेल. अत्यंत देखणी अशी ही शिल्पाकृती दहाव्या किंवा अकराव्या शतकात कोरलेली दिसते. मूर्तीची शिला १.१० मीटर × ०.६० मीटर असून मूर्तीची उंची ९० सेंटीमीटर आहे.

हरिहराची स्थानक मूर्ती चतुर्भुज असून उजवे अंग शंकराचे तर डावे अंग विष्णूचे आहे. दोन्ही उजवे हात तुटलेले असल्यामुळे शिवाच्या आयुधांविषयी लिहिता येत नाही. डाव्या भागाकडील दोन्ही हातांत विष्णूची आयुधे दिसतात. खालच्या डाव्या हातात चक्र तर त्यावरील हातात गदा आहे.

मुकुटाचा उजवा भाग जटा-मुकुटाचा तर डावा भाग करंड-मुकुटाचा दिसतो. डाव्या कानात मकरकुंडल असून उजव्या कानात रत्नकुंडल आहे. विष्णूकडील भागात गळ्यात वैजयंतीमाळा कोरलेली असून शिवाकडील गळ्याच्या भागात मुण्डमाला कोरलेली आहे.

दोन्ही बाजूंच्या चार भुजांना बाजूबंद तसेच देखणे कोरीव काम केलेली कंकणे घातलेली आहेत. खांद्यावर यज्ञोपवीत दिसते तर कमरेस रत्नमेखला बांधलेली आहे. पायात वाळे असून पायथ्याशी उजव्या बाजूला शंकराचे वाहन नंदी दिसतो तर डाव्या भागाला विष्णूचे वाहन गरुड दिसतो. दोघांचे सेवकही दिसतात. नखशिखान्त कोरीव काम केलेली ही मूर्ती म्हणजे सिंदखेडचे वैभवच म्हटले पाहिजे.

जाधवरावांच्या बखरीमधील उल्लेखानुसार लखुजी जाधवराव ज्या वेळी रविराव ढोण्याचा बंदोबस्त करण्यासाठी प्रथम सिंदखेडला आले त्या वेळी पांथस्थाच्या वेषात होते. नीळकंठेश्वरासमोरील पुष्करिणीवरच त्यांचा मुक्काम होता. नीळकंठेश्वराने लखुजींना गोसाव्याच्या रूपात दर्शन देऊन अभय दिले होते. स्वाभाविकच लखुजीराजे सिंदखेडला स्थायिक झाल्यानंतर त्यांनी नीळकंठेश्वराच्या दीप-नैवेद्याची व्यवस्था केली होती. नीळकंठेश्वराचे दर्शन जिजाऊसाहेबांसोबत बाल शिवबानेही घेतलेले होते.

### रामेश्वर मंदिर

रामेश्वर मंदिरही लखुजी जाधवरावांच्या पूर्वीचे दिसते. लखुजीराजांनी देशमुखी प्राप्त झाल्यावर गुंडमुळयांना जे अभयपत्र लिहून दिले त्यात शेवटी ' . . . . . . जो कोणी अन्यथा करील त्यास . . . . . . नीलकंठ रामेश्वराची शपथ असे ' असा उल्लेख आहे. त्यावरून रामेश्वर मंदिर हे बरेच प्राचीन असावे असे वाटते. रामेश्वर हेच सिंदखेडकरांचे ग्रामदैवत आहे. पारंपरिक समजुतीनुसार मंदिराजवळच शरभंग ऋषीचा आश्रम होता. प्रभू रामचंद्र लंकेस जाताना काही काळ या आश्रमात विसावले. जाताना त्यांनी शिवलिगाची स्थापना केली तोच आजचा रामेश्वर.

लखुजीराजांच्या समाधीच्या दक्षिण अंगाला असलेले हे रामेश्वर मंदिर एवढे प्राचीन वाटत नसले तरी बरेच जुने आहे एवढे निश्चित. अलीकडे श्रीरामेश्वर समितीने जीर्णोद्धार केल्यामुळे मूळ मंदिराचा तोंडवळा बराच बदललेला आहे. जुने बांधकाम दगडी चौथऱ्यावर विटांचे केलेले होते. देवळासमोरील विटांची तटबंदी पूर्णपणे ढासळलेली आहे. मुख्य मंदिर दगडाचे असून कळस विटांनी बांधून काढलेला आहे. प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून रामेश्वरासमोर दोन नंदी दिसतात. ते अलीकडे ठेवलेले वाटतात. मंदिराच्या चारही बाजूंनी पडवी काढलेली होती. आईच्या इच्छेनुसार लखुजींनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. बाल शिवबाराजे जिजामातेसह पुण्यास परत जाताना रामेश्वराचे दर्शन घेऊनच पुढे गेले असा पोवाडयात उल्लेख आढळतो. रामेश्वराच्या दक्षिणेकडूनच इतिहासप्रसिद्ध पुणे—नागपूर डाक लाईन गेलेली आहे.

रामेश्वर मंदिरासमोरच विस्तीर्ण राम बारव होती. ती आता पूर्णपणे बुजलेली असून तेथे शेत झाले आहे. उत्खनन झाल्यास राम बारवेचे स्वरूप नेमके कळू शकेल. राम बारवेच्या पाण्याने त्वचा रोग बरे होत, असे गावकरी सांगतात.

### रेणुका मंदिर

रामेश्वराच्या पिछाडीला व लखुजी जाधवरावांच्या समाधिस्थानाच्या दक्षिणेला उत्तराभिमुख छोटी देवळी आहे. या ठिकाणी रेणुकेची तांदळी मूर्ती दिसते. ती लखुजींनी स्थापन केली होती असे म्हणतात. म्हाळसाबाईने कन्याप्राप्तीसाठी नवस केला होता तो याच रेणुकेला.

रेणुकेच्या डाव्या हाताला भवानीची तर उजव्या हाताला सूर्याची मूर्ती दिसते. सूर्याची मूर्तीही मध्ययुगीन असून अतिशय देखणी आहे. दोन्ही हातांत कमळे धारण केलेली असून पायात जोडे घातलेले आहेत. पायतळी सप्तअश्व कोरलेले दिसतात. सूर्यदेवाची ही स्थानक मूर्ती ४५ सेंटीमीटर उंच आहे.

रेणुका मंदिराजवळच डाव्या अंगाला गणपतीची जुनी देवळी आहे. त्याला लागून जुने होमकुंड दिसते.

**गंगासागर**

रामेश्वर मंदिराच्या नैऋत्येस सुमारे एक किलोमीटर अंतरावर गंगासागर बारव आहे. बारव अष्टकोनी असून तीत उतरण्यासाठी दक्षिणेकडून पायऱ्या आहेत. विहिरीचा व्यास सुमारे १०.६० मीटर असून अष्टकोनाच्या एका कोनाची लांबी ४.४० मीटर आहे. गंगासागर बारवेवर एका वेळी बावीस मोटा चालत. गंगासागराचे बांधकामही राव जगदेवानेच केलेले आहे. गंगासागर सध्या महाराष्ट्र शासनाच्या तालुका बीजगुणन केंद्राच्या ताब्यात आहे.

**बाळसमुद्र**

राव जगदेवाने बांधलेली बाळसमुद्र ही विहीर अतिशय देखणी असून अष्टकोनी आकाराची आहे. आत उतरण्यासाठी मात्र पायऱ्या नाहीत. दगडी बांधणीच्या या विहिरीवर एकाचवेळी २४ मोटा चालत. रामेश्वर मंदिराच्या पश्चिमेस एक किलोमीटर अंतरावर गंगासागराजवळच बाळसमुद्र विहीर पाहायला मिळते. ही विहीरदेखील महाराष्ट्र शासनाच्या तालुका बीजगुणन केंद्राच्या ताब्यात आहे. विहिरीचा व्यास सुमारे ११.२० मीटर असून पाणी गोड आहे.

**समृद्ध ऐतिहासिक स्थान**

इतिहासाशी नाते सांगणारी २५ मठ-देवळे, ३ मशिदी, २ दर्गे, २ चावड्या, जुने भव्य वाडे, अगणित बागा, दाट आंबराया, नयनमनोहर तळी, विस्तीर्ण पुष्करिणी, तृणाच्छादित हिरव्यागार इवल्याश्या टेकड्या अशा अनेक प्रेक्षणीय स्थळांनी समृद्ध असलेली एकेकाळची जाधवरावांची ही राजधानी आज काळाशी झगडत कशीबशी उभी आहे. शिल्पशास्त्र, वास्तुशास्त्र, स्थापत्य, मूर्तिशास्त्र, कृषिशास्त्र, इतिहास यांसारख्या विविध विषयांवरील तज्ज्ञांसाठी जसे सिंदखेड हे आकर्षण असू शकते तसेच ते प्रत्येक शिवभक्तांसाठीही जिजामातेचे जन्मस्थान म्हणून दर्शनीय आहे.

असे हे महत्त्वपूर्ण स्थान महाराष्ट्र शासनाने नुकतेच पर्यटन केंद्र म्हणून घोषित केले आहे. एवढेच नव्हे तर, शिवाजीमहाराजांच्या मातोश्रींचे जन्मस्थान म्हणून त्याचा साजेसा विकास करण्याचाही शासनाने निर्धार व्यक्त केला आहे ही खचितच आनंदाची बाब आहे.

**सिंदखेडच्या परिसरात**

सिंदखेडच्या परिसरातील देऊळगावराजा येथील अंगुष्ठमात्र श्रीव्यंकटशाची मूर्ती दर्शनीय आहे. याशिवाय येथील खारीबाव, मोतीसमाध जाधवांची गढी हेही प्रेक्षणीय आहेत. किनगावराजा, अडगावराजा व मेहुणे येथेही जाधवांच्या गढ्या पाहायला मिळतात. मेहुणे या गावीच संत चोखामेळा जन्मलेले आहेत.

सिंदखेडपासून सुमारे ७५ किलोमीटर अंतरावरील लोणार हे गाव पौराणिक क्षेत्र म्हणून भेट देण्यासारख आहे. मेहेकरही असेच प्रेक्षणीय स्थळ आहे. लोणारचे तळे, नरसिंह मंदिर, रेणुका मंदिर, दैत्यसूदन मंदिर, मारुती मंदिर इत्यादी स्थळे भेट देण्यासारखी आहेत. मेहेकरची बालाजीची मूर्ती व मंदिर पाहण्यासारखे आहे. सिंदखेडच्या परिसरातच साखरखेर्डा उर्फ फत्तेखेर्डा हे इतिहास प्रसिद्ध गाव आहे.

## निवडक संदर्भ ग्रंथ


*Maharashtra State Gazetters–Buldana District*

**शककर्ते शिवराय** खंड १—विजय देशमुख

**शारदाश्रम वार्षिक** शके १८५५—संपादक य. खु. देशपांडे

**सह्याद्री** खंड २६, अंक ३, जानेवारी १९४७

**मराठा कुळांचा इतिहास**—गोपाळ दाजीबा दळवी

**सिंदखेडकर राजे जाधवरावांची बखर**—द. बा. महाजन

**राजे जाधवरावांचे घराणे आणि त्यांचे सेनापती घराण्यातील श्री. रामकृष्ण सदाशिव खेकाळे**—संपादक उत्तमराव जाधवराव

**वऱ्हाडचा इतिहास**—या. मा. काळे


9630

# पुरातन स्मारके दर्शविणारा
# सिंदखेडराजा शहराचा नकाशा





राजे लखुजी जाधव यांची समाधी

किंमत रु. १.७०